यशस्विनी

दीपाराणी सहस्त्रबुद्धे

# नावीन्यपूर्ण निसर्गशाळा

नावीन्यपूर्ण सेवा देणाऱ्या व्यावसायिकांना देण्यात येणारा 'रमाबाई अनंत जोशी' पुरस्कार 'आयकॉस'च्या मानसी करंदीकर व केतकी घाटे यांना मिळाला. 'आयकॉस'म्हणजे पृथ्वी, घर किंवा निवास. 'आयकॉस' पर्यावरणाचे जतन, संवर्धन, आणि पुनरुज्जीवन सेवा पुरवते. ही संकल्पना त्या शहर आणि ग्रामीण दोन्हीकडे पोचवतात.

ग्रामीण भागातील लोकांकरिता निसर्गशाळा उपक्रम घेतला जातो. त्यांच्याकरता जंगलफूड स्पर्धा घेतली. सगळ्या बायकांना रानभाजीचा एक पदार्थ बनवून आणायला सांगितला. वीस वेगवेगळे पदार्थ आले. सगळ्यांनाच बक्षिसे दिली. कारण ते लोक हल्ली शहरी भाज्या खायला लागले आहेत. फाफडी, कर्डू, किसाडीसारख्या भाज्या नामशेष होत चालल्या आहेत. त्या फारच पोषक आहेत. कर्डू सांधेदुखीवर अत्यंत उपयोगी आहे. तर किसाडी अत्यंत कडू फळ आहे. ते येते त्या दिवसात तीनदा



मानसी व केतकी

खाल्ले, तर पित्त कधीच होत नाही. त्यांना सांगितले तर म्हणतात "अरे, आम्हाला तर हे माहिती आहे. म्हणूनच पूर्वी रोग नव्हते." शहरी लोकांनीही हे जाणून घेतले पाहिजे. तसेच शहरी भागात पाषाणमध्ये एक एकर जागेवर त्यांनी काही भागांत केवळ छोटी डबकी, काही भागांत गवत आणि काही भागांत विशिष्ट झाडे लावून एक छोट्या जंगलाचे रूपच या जागेला दिले.

हा प्रयोग पूर्ण होण्याआधीच तिथल्या जमिनीचा कस सुधारला. शहरात कधीही न दिसणाऱ्या अनेक छोट्या पक्ष्यांनी तिथे घरटी बांधण्यात सुरवात केली. फुलपाखरांच्या असंख्य जाती तिथे पाहता यायला लागल्या. ही पर्यावरणाची संकल्पना पुण्यासारख्या शहरवासीयांनाही पटते आहे. त्यांच्यापर्यंत पोचते आहे. पर्यावरणीय कामाबरोबरच 'ऑयकॉस' सेव्ह वर सह्याद्री (SOS) या पुण्याजवळ सुरू असलेल्या मुळशी भागात चळवळीचे काम करत आहेत. परदेशात सापासारख्या प्राण्यांकरता भूमिगत रस्ते ठेवतात. आपल्याकडेही तसेच व्हावे, यासाठी या दोघी प्रयत्नशील आहेत.

